22 MAR 2026
सकाळ

# समृद्धी पाटीलला ज्यूदो स्पर्धेत रौप्य



समृद्धी पाटील

कोल्हापूर : चंदीगड येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय महिला आंतरविद्यापीठ ज्यूदो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या समृद्धी पाटील हिने ५२ किलो गटात रौप्यपदक पटकावले. समृद्धीला डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक शरद बनसोडे, प्रा. ज्योती लेंगरे यांचे प्रोत्साहन लाभले.

22 MAR 2026

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्या उच्च शिक्षणावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिव्यांग विद्यार्थी योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठात उद्या, सोमवारी उच्च शिक्षण संस्थांसाठी 'सुलभता मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिव्यांग व्यक्तींसाठी योजना आणि शिवाजी विद्यापीठातील समावेशक शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यशाळेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहसचिव डॉ. आर. मनोजकुमार हे प्रमुख वक्ते आहेत. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी १० ते दुपारी ४:३० या कालावधीत ही कार्यशाळा होणार असून



प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत प्रो. संध्या लिमये, डॉ. मधुरा नागचौधरी, डॉ. टाटा रामकृष्णा हेही मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2026

# कुस्ती : शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हरियाणा येथील कुरुक्षेत्र विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भरघोस यश मिळविले. स्पर्धेत संपूर्ण भारतातून १६८ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने पाचवा क्रमांक प्राप्त केला .




**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत यश मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.**

महिला कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरच्या तन्वी मगदूमने (सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड) हिने ५७ किलो गटात सुवर्णपदक पटकावले. गौरी पाटील (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) हिने ५० किलो गटात कांस्यपदक, तर सृष्टी भोसले (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर) हिने ६५ किलो गटात कांस्यपदक पटकाविले. संघाला प्रशिक्षक डॉ. विक्रमसिंह नांगरे, व्यवस्थापक डॉ. प्रताप जाधव, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदींचे मार्गदर्शन लाभले.

2 2 MAR 2026
लोकमत

# 'तुकाराम महान संत'

कोल्हापूर : तुकाराम मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारे महान संत आहेत, असे प्रतिपादन ह.भ.प. उल्हास पाटील यांनी केले. विद्यापीठाच्या तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित तुकाराम व्याख्यानमालेअंतर्गत 'संत तुकारामांचा मानवतावाद' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. टी. एस. पाटील, प्रा. अवनिश पाटील, प्रा. अक्षय सरवदे, प्रा. दशरथ पारेकर, आदी उपस्थित होते.

2 2 MAR 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात हॉस्टेल डे उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाचा हॉस्टेल डे उत्साहात झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव प्रिया देशमुख, डॉ. माधुरी वाळवेकर, आदी उपस्थित होते.

यानिमित्ताने स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा यावेळी सत्कार केला. यावेळी फुगडी, गायन, एकांकिका अशा १९ सांस्कृतिक स्पर्धा पार पडल्या.

2 2 MAR 2026
लोकमत

# समृद्धी पाटीलला ज्युदो स्पर्धेत रौप्यपदक

**कोल्हापूर :** चंडीगड येथे सुरू असलेल्या



अखिल भारतीय महिला आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या समृद्धी संदीप पाटील हिने ५२ किलो गटामध्ये रौप्यपदक मिळवले. समृद्धी ही कोतोली येथील चौगुले महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. या स्पर्धेसाठी प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठात १० ते १४ मार्चदरम्यान प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. तिला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक शरद बनसोडे, प्रा. ज्योती लेंगरे यांचे मार्गदर्शन लाभले.